# विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे कार्यालय,

( महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र )

टेलिफोन क्रमांक : ०२५३-२४६२४०० ई-मेल :- egsdc.nashik-mh@gov.in


---

क्र.रोहयो/कार्या-८/3428/२०१८

दिनांक :- १२/१०/२०१८

प्रति,

उपजिल्हाधिकारी (रोहयो)
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं/नरेगा)
नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार, अहमदनगर

**विषय - हजेरीपत्रकातील उपस्थिती दर्शविण्यासाठी योग्य पध्दत अवलंबिण्याबाबत**

**संदर्भ - रोजगार हमी योजना सारग्रंथ, खंड-१**

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत हजेरीपत्रकात मजूरांची उपस्थिती दर्शविण्याकरिता योग्य पध्दत वापरली जात नसल्याचे कामाच्या तपासणीदरम्यान आढळून आले आहे. रोजगार हमी योजना सारग्रंथ- भाग १ (पान क्र.११९) मध्ये मजूरांची सकाळची / दुपारची उपस्थिती / अनुपस्थितीबाबत मार्गदर्शन केले आहे व उपस्थिती / अनुपस्थिती दर्शविण्याकरिता योग्य चिन्हे वापरण्याबाबत शासन परिपत्रक नि.वि.क्र.इजीएस-११८६/प्र.१०/इएसपी-१२ दि.०७.०८.१९८६, दि.२०.१०.१९८६ मध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे -

रोजगार हमी योजनेअंतर्गत काम करणा-या मजूरांची हजेरी दररोज दोन वेळा म्हणजे सकाळी काम सुरु होताना पहिल्या १/२ तासामध्ये व सुट्टी झाल्यानंतर काम संपण्यापूर्वी शेवटच्या १/२ तपासामध्ये घेतली जावी. मजूर या दोन्ही वेळेला उपस्थित असेल तरच त्याची त्या दिवसाची हजेरी त्याने पगाराकरिता केलेल्या कामाच्या प्रमाणात धरण्यात येईल. मजूर फार उशिरा आला किंवा दुपारी लवकर निघून गेला व त्यामुळे तो १/२ दिवस गैरहजर असेल तर तो दिवस पगाराच्या दृष्टीने हजेरीचा दिवस म्हणून धरला जाणार नाही. तर तो संपूर्ण दिवस गैरहजर आहे असे समजण्यात येईल.

मजूरांची हजेरी हजेरीपटात योग्य प्रकारे लावण्यात यावी. (तो जसा हजर असेल त्याप्रमाणे), या दृष्टीने हजेरीपटात सकाळी व दुपारी हजेरी मांडण्याबाबत पुढीलप्रमाणे पध्दत अवलंबण्यात यावी -

| अ.क्र. | तपशील | चिन्ह | |
|---|---|---|---|
| १. | **सकाळी हजर** | \ | **(डावीकडून उजवीकडे)** |
| २. | **सकाळी गैरहजर** | ◯ | **(मोठे वर्तुळ)** |
| ३. | **दुपारी हजर** | / | **उजवीकडून डावीकडे** |
| ४. | **दुपारी गैरहजर** | ○ | **(लहान वर्तुळ)** |

दिवसाची दोन्ही वेळची हजेरी मांडल्यानंतर हजेरीपत्रकामध्ये मजुराच्या नावापुढे संबंधित तारखेच्या रकान्यामध्ये चिन्हे पुढे दर्शविल्याप्रमाणे दिसतील -

| | | |
|---|---|---|
| १ | **सकाळी हजर व दुपारी हजर** | X |
| २ | **सकाळी हजर व दुपारी गैरहजर** | ⦸ |
| ३ | **सकाळी गैरहजर व दुपारी हजर** | Ø |
| ४ | **सकाळी व दुपारी गैरहजर** | ⊙ |

तरी, उपरोक्त नमूद केलेप्रमाणे मजूरांची हजेरी हजेरीपत्रकात नोंदविणेबाबत सर्व ग्रामसेवक / ग्रामरोजगार सेवक, यंत्रणा अधिकारी यांना कळविण्यात यावे.

(अर्जुन चिखले)
**उपायुक्त (रोहयो)**
**नाशिक विभाग, नाशिक**

प्रत - १.मा.जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक (मग्रारोहयो)
२.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सहजिल्हा कार्यक्रम समन्वयक (मग्रारोहयो)
नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार, अहमदनगर - यांना माहितीस्तव सादर.